विशेष दिवाणी दावा क्र.७०/१९९०
सुलोचनादेवी व इतर वि. दुर्गादेवी व इतर
CNR-MHJNO20000171990

## <u>निशाणी क्र.२५६ वरील आदेश</u>

प्रस्तुतच्या अर्जात वादींनी कथन केले आहे की, वादीने दयानंद भक्त यांचे साक्षीचे शपथपत्र दाखल केले असून काही मूळ कागदपत्रे अभिलेखावर कागदपत्रांची सूची अनन्वे दाखल केले आहे. सदर कागदपत्रे हे वादाचे निराकरण करण्यासाठी तसेच वादीचे कथन सिध्द करण्यासाठी आवश्यक असल्याने सदर कागदपत्राच्या अभिलेखावर दाखल करुन घेण्याबाबत अर्ज दिलेला असून न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

२) सदर अर्जावर प्रतिवादींतर्फे म्हणणे देण्यात आले की, यादीनुसार दाखल केलेले कागदपत्रे प्रतिवांदींना मान्य नाही. मृत्यूपत्रानुसार प्रतिवादी क्र. १ यांना व्यवहार करण्याचा कोणताही हक्क नाही तसेच प्रतिवादी क्र. ६ व ७ हे इ.स.१९९० मध्ये अज्ञान असल्याने मृत्यूपत्रानुसार ते सज्ञान होईपर्यत वादग्रस्त मिळकतीबाबत कोणतेही व्यवहार ग्राहय धरले जाणार नाही. सदरचे दस्त वादीने उशीराने विचारपुर्वक व प्रकरणात गुंतागुंत निर्माण करण्याहेतुने दाखल केला आहे. वि. उच्च न्यायालयाने वादीचा निशाणी क्र.२११ नुसारचा इ.स.१९९६ चा दस्त रद्द केला आहे. तरी प्रतिवादींच्या हक्कात योग्य तो आदेश पारीत करावा अशी विंनती केली आहे.

३) दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पडताळणी केली असता, वादींनी करारपुर्तीसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रस्तूतच्या अर्जासोबोत वादीने मूळ दस्तवेज दाखल केले आहे. सदर मूळ दस्तावेजास प्रतविादीने जरी हरकत घेतली असली तरी त्या हरकतीच्या सत्यतेची पडताळणी होणे बाकी आहे. तसेच प्रतिवादीस साक्षीपुराव्यादरम्यान सदर दस्ताबाबत उलट तपास घेण्याचा अधिकार असल्याने दाव्याचे स्वरुप व वादीचे कथन पाहता वादीस त्याचे कथन सिध्द करण्यासाठी सदर मूळ दस्तावेज दाखल करण्याची परवानगी देणे न्यायोचीत ठरेल. परंतू

सदरहु दस्तावेज वादीचे ताब्यात असतांनाही दाखल करण्यास झालेला विलंब पाहता अर्ज खर्चासह मंजूर करणे उचित ठरेल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१) अर्ज रु.५००/– खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) सदर मूळ दस्तावेज दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३) वादींनी खर्च रु.५००/– आज रोजी किंवा पुढील तारखेच्या आत प्रतिवादीस अदा करावा.

स्वाक्षरीत /–

(**एम. एस. कुलकर्णी**)

दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),

जालना

दिनांक १५.११.२०२१